

भरत नाट्य मंदिर (सदाशिव पेठ) : 'साय-फाय करंडक २०१७' पटकावल्यानंतर जल्लोष करताना प्रारंभ पुणे संस्थेच्या 'वाट' एकांकिकेचा संघ. या वेळी संघासह उपस्थित मान्यवर.

# 'प्रारंभ'ने पटकावला साय-फाय करंडक

**पुणे, ता. २५ :** सायबर क्राइमसारख्या ज्वलंत विषयावर सादर झालेल्या एकांकिका... एकांकिकेचा निकाल जाहीर झाल्यानंतर युवक-युवतींनी केलेला जल्लोष... अशा वातावरणात रविवारी 'साय-फाय करंडक २०१७' ही एकांकिका स्पर्धा रंगली. 'क्विक हिल फाउंडेशन'ने पुणे पोलिसांच्या सहकार्याने घेतलेल्या स्पर्धेत प्रारंभ संस्थेच्या 'वाट' या एकांकिकेने विजेतपद पटकावले, तर अनबॉक्स पुणे संस्थेच्या 'फोर डायमेंशन' आणि जॅकरांडा पुणे संस्थेच्या 'मिशन परफेक्शन' या एकांकिकांनी अनुक्रमे दुसरा आणि तिसरा क्रमांक मिळवला.

विजेत्यांना क्विक हिल टेक्नॉलॉजीज लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक कैलाश काटकर, मुख्य तंत्रज्ञान अधिकारी संजय काटकर, पोलिस उपायुक्त सुधीर हिरेमठ (सायबर क्राइम) आणि एक्स्प्रेशन लॅबचे संचालक प्रदीप वैद्य यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. दिग्दर्शक सुनील सुकथनकर, अभिनेते सुयश टिळक, अभिनेत्री पर्ण पेठे, गिरीश जोशी उपस्थित होते.

स्पर्धेत पुणे, मुंबई, औरंगाबाद, कोल्हापूर, गोवा आणि नागपूर येथील एकूण २० संघांनी भाग घेतला. आलोक राजवाडे आणि अश्विनी गिरी यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

कैलाश काटकर म्हणाले, ''फाउंडेशनने २०१४ मध्ये स्थापना झाल्यापासून संपूर्ण देशभरातील ८ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना सायबर सिक्युरिटीविषयी प्रशिक्षण आणि मार्गदर्शन दिले आहे. सायबर सुरक्षा ही महत्त्वाची गोष्ट आहे. त्यावर आधारित उत्कृष्ट एकांकिका सादर झाल्या आणि या ज्वलंत विषयावर जनजागृतीही झाली.'' मानवी जीवनावर डिजिटल क्रांतीचा प्रभाव दर्शविणारे एक सशक्त व्यासपीठ तयार करणे हा या अनोख्या एकांकिका स्पर्धा महोत्सवाचा उद्देश होता.